# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक २४६-२२** **दिनांक १२/०८/२०२**

## इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मर मधील कॉपर व ऑईल चोरी करणा-या आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २३/०३/२०२२ रोजी सकाळी ०६:०० वाजता ते दिनांक २५/०३/२०२२ रोजी सकाळी ०९:०० वाजण्याच्या दरम्यान न्युवान इंडस्ट्रिज, सिडको, धुमाळनगर, वसई (पुर्व), ता.वसई, जि.पालघर येथील महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाचे, इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मर मधील कॉपर व ऑईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केल्याबाबत सरकार तर्फे फिर्यादी नामे. श्री.अजय सदु भुयाळ वय ३१ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा.मु.शिरटे, सफाळे, पो.विरातन बुद्रुक, जि.पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२५/०३/२०२२ रोजी अज्ञात आरोपीतांवर पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.I २७६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पेल्हार पोलीस ठाणे व इतर पोलीस ठाण्यात अशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्याने वर नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या घटनास्थळावरील तांत्रिक माहीती व गुप्त बातमीदार यांच्यामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे १) मैनुद्दीन अब्दुल खान, वय-२८ वर्षे, रा. वसई फाटा, वसई (पु.), ता.वसई, जि.पालघर, २) इबरार अहमद चौधरी, वय - २९ वर्षे, रा. धानिव - नवजिवन रोड, वसई (पु.), ता.वसई, जि.पालघर, ३) सनुप देवीदत्त तिवारी, उर्फ सोनू पंडित, वय-२४ वर्षे, रा. केटी व्हीलेज, वसई (प.), ता.वसई, जि.पालघर, ४) जुमाई ईमामअली शेख, वय-६५ वर्षे, रा. आनंदनगर, वसई (प.), ता.वसई, जि.पालघर ५) प्रतापसिंह उदयसिंह, वय-५० वर्षे, रा. गोलाणीनाका, वसई (पुर्व), ता.वसई जि.पालघर यांना अटक करण्यात आली. आरोपी क्र. ०१ ते ०२ यांना दि. ०३/०८/२०२२ रोजी व आरोपी क्र. ३ ते ५ यांना दिनांक ०५/०८/२०२२ रोजी अटक करुन त्यांच्याकडून चोरीस गेलेले कॉपर वायडींग तार व ऑईल तसेच गुन्हा करण्याकरीता वापरलेले वाहन असा एकुण ५,३३,७५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

नमुद आरोपीत यांच्याकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) पेल्हार पो.ठाणे, गु.रजि.नं. I २७६/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९,४११,३४ प्रमाणे.

२) पेल्हार पो.ठाणे, गु.रजि.नं. I ३१८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९,४११,३४ प्रमाणे.

३) वालीव पो.ठाणे, गु.रजि.नं. I ५१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे.

४) वालीव पो.ठाणे, गु.रजि.नं. I ४३२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे.

५) वालीव पो.ठाणे, गु.रजि.नं. I १४३९/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री.महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि./सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पो.ना./प्रताप पाचुंदे, पो.अं./संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

----oooo----